लोकमत दि. 22/01/2023

# नांदेडमध्ये चोराकडून १५ मोबाइल जप्त

लोकसत्ता वार्ताहर

**नांदेड** : नांदेडच्या स्थानिक गुन्हे शाखेने मोबाइल चोरी करणाऱ्या एका आरोपीला पकडले असून त्याच्याकडून चोरीचे १५ मोबाइल जप्त केले आहेत. जप्त करण्यात आलेल्या मोबाइलची किंमत तीन लाख रुपयांच्या जवळपास असल्याचे सांगण्यात आले.

नांदेड शहरासह जिल्ह्यात मोबाइल चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असताना नांदेडच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना माहिती मिळाली, की ग्यानमाता शाळेसमोरील रोडवर एक मोबाइल चोर असून तो अजून गुन्हा करण्याच्या तयारीत आहे. पोलिसांनी खबऱ्याने दिलेल्या माहितीची दखल घेत त्या भागातून आरोपी शेख सरवर शेख आयर यास ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने आपल्या तीन चोर सहकाऱ्यांच्या साथीने चोरी केली असल्याचे सांगितले. गुन्हे शाखेच्या पथकाने संबंधित आरोपीला विमानतळ पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

# चोरट्याला पकडले; १५ मोबाइल जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड** :शहरातील वेगवेगळ्या भागात मोबाइल चोरी करणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने पकडले असून, त्याच्याकडून १५ मोबाइल जप्त करण्यात आले आहेत. ही कारवाई शनिवारी करण्यात आली.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, पोनि. द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक मोबाइल चोरट्याच्या शोधात होते. ग्यानमाता शाळेजवळ रस्त्यावर मोबाईल चोरी करणारा एक आरोपी असल्याबाबत पथकाला माहिती मिळाल्यानंतर पथकाने सापळा रचून शेख सरवर शेख अयर (रा. गाडीपुरा) याला पकडले. त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने इतर साथीदारासोबत मिळून २ लाख ७० हजार रुपये किमतीचे १५ मोबाइल चोरी केल्याची कबुली दिली. त्यांच्याकडून हे मोबाइल जप्त करण्यात आले असून, इतर तीन आरोपींचा शोध सुरू आहे. आरोपीला विमानतळ पोलिसांच्या ताब्यात दिले. या पथकात पोउपनि दत्तात्रय काळे, बालाजी तेलंग, दीपक पवार, विठ्ठल शेळके, विलास कदम, गणेश धुमाळ, महेश बडगू, राजू सिटीकर, दीपक ओढणे यांचा समावेश होता.

# गावठी पिस्टल अन् दोन काडतुसे जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड** : पोलिसांकडून रात्री ११ वाजेनंतर शहरात अचानक नाकाबंदी करण्यात येऊन ऑपरेशन ऑल आऊट राबविण्यात येत आहे. २० जानेवारीच्या रात्री गुन्हे शोध पथकाने जनता कॉलनी भागात एकाला ताब्यात घेऊन त्याच्याकडून गावठी पिस्टल आणि दोन जिवंत काडतुसे जप्त केली आहेत.

पोलिस उपअधीक्षक चंद्रसेन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. आर.सी. वाघ यांनी ऑपरेशन ऑल आऊट राबविले.



त्यात जनता कॉलनी भागात रात्रीच्या वेळी एक जण संशयितरीत्या फिरत होता. उत्कर्ष प्रमोद सूर्यवंशी याला पकडून त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या कमरेला गावठी पिस्टल आणि त्यात दोन जिवंत काडतुसे आढळून आली. पोलिसांनी ते जप्त केले असून या प्रकरणात शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.